# जपानी पुष्परचना - भाग ६

विविध रंगाची फुले पाने वापरून केलेल्या पुष्परचना आपण गेले काही महिने बघत आहोत. पुष्परचना म्हटल्यावर फुले तर पाहिजेतच ! पण त्याच्या जोडीला त्या फुलांचे सौंदर्य खुलविण्यासाठी पाने ही हवीतच ! फुलांइतकीच पाने ही महत्वाची ! फुलांप्रमाणेच झाडांची पाने सुद्धा रंगीत किंवा विविध हिरव्या रंगाची छटा दाखविणारी निसर्गामध्ये असतात. मग नुसतीच पाने वापरून का बरे रचना करू नयेत ? मनात असा विचार आला आणि सहज जी पाने फांद्या माझ्याकडे होत्या त्यातूनच विविध रचना करण्याचा प्रयत्न केला. त्यातल्या काही मोजक्या रचना आपण यावेळी बघू या.




रचना १ मध्ये शतावरी ( Asparagus ) वेलाच्या दोन नाजूक फांद्या आणि ॲरो हेड ( Syngonium ) झाडाची पाने एवढेच वापरली आहेत. हिरव्या पानावरच्या पांढऱ्या रेषा किती सुंदर आहेत. शतावरीच्या फांद्या line effect देतात व पाने mass effect देतात. line effect आणि mass effect हे इकेनोबो पुष्परचनेचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. पानांवरच्या पांढऱ्या रेषांना जुळणारी पांढरी background वापरली आहेत.




रचना २ मध्ये दोन काळी पुष्पपात्रे वापरली आहेत. दोन्ही पुष्पपात्रे मिळून एक रचना आहे.  रचना १ मधीलच पाने व फांद्या आहेत.




रचना ३ मध्ये पानांचे पुष्पपात्राच्या दोन्ही बाजूला दोन ग्रुप केलेत व दोन्ही ग्रुप ला जोडणारी शतावरी (Asperagus) ची नाजूक वेल वापरली आहे.

अशा तऱ्हेने अजूनही कितीतरी प्रकार याच पानातून, फांद्या वापरून करता येतील. यात कल्पनाशक्ती लढवायला खूप वाव आहे. एकही फुल न वापरता सुद्धा रचना करता येतात. कारण निसर्गातील सर्वच गोष्टी खूप सुंदर आहेत.


सौ. अरुंधती शिरीष देशपांडे ( M.Sc. M.Phil Chemistry)

व्हाईस प्रेसिडेंट, इकेनोबो इकेबाना पुणे शाखा.

फोन नं. ९८८१०४३४५६

email : asdssd@gmail.com